दैनिक

# व्याघ्र शौर्यम

उशीरा दिलेला न्याय हा अन्यायासारखाच असतो.

epaper.vyaghrashuryam.com vyaghrashuryam.com vyaghrashuryam@gmail.com

जळगाव ▪ वर्ष - १ ▪ अंक - २२१ ▪ मंगळवार, दि.१२ मे २०२६ Reg. No.MHMAR/25/A2382 ▪ पाने - 8 ▪ किंमत रु.2

# अधिकारी यांच्या निकटवर्तीयाच्या हत्येचा उलगडा!

## ३ आरोपी जेरबंद : एका युपीआय पेमेंटमुळे लागला छडा



**कोलकाता ।** पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांचे अत्यंत विश्वासू सहकारी चंद्रनाथ रथ यांच्या निर्घृण हत्या प्रकरणात पश्चिम बंगाल पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. या हायप्रोफाईल प्रकरणाचा कसून तपास करताना पोलिसांनी बिहार आणि उत्तर प्रदेश या शेजारील राज्यांमधून तीन संशयित आरोपींना सोमवारी बेड्या ठोकल्या आहेत. या अटकेमुळे तपासाला आता एक ठोस दिशा मिळाली आहे.

गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेल्या खात्रीलायक माहितीच्या आधारे पोलिसांनी विशेष पथके तयार केली होती. या पथकांनी अत्यंत शिताफीने कारवाई करत बिहारमधील बक्सर येथून मयंक राज मिश्रा आणि विकी मौर्य या दोन मुख्य संशयितांना ताब्यात घेतले. त्याच वेळी, एका दुसऱ्या तपास पथकाने उत्तर प्रदेशातील बलिया जिल्ह्यातून राज सिंह नावाच्या तिसऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळल्या. दि. ६ मे रोजी उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील मध्यमग्राम भागात रात्रीच्या वेळी ही राजकीय हत्या घडवून आणण्यात आली होती. तपासाधिकाऱ्यांच्या मते, अटक करण्यात आलेले हे तिघेही व्यावसायिक सुपारी किलर आहेत. त्यांना या विशिष्ट हत्येसाठी परराज्यातून भाड्याने बोलावण्यात आले होते. गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधिकाऱ्यांनी रविवारी या तिघांचीही मॅरेथॉन चौकशी केली. या सखोल चौकशीनंतर मध्यमग्राम पोलिसांनी त्यांना अधिकृतपणे अटक केली आहे. कोणताही गुन्हेगार कितीही हुशार असला तरी तो एक चूक नक्कीच करतो, हे या प्रकरणात पुन्हा सिद्ध झाले. हत्येचा थरार घडवून आणल्यानंतर घटनास्थळावरून पळ काढत असताना आरोपींनी बाली टोल नाक्यावरून आपले वाहन नेले. टोल भरण्यासाठी त्यांनी घाईघाईत युनिफाइड पेमेंट्स इंटरफेसचा वापर केला. त्यांची हीच डिजिटल चूक पोलिसांसाठी ब्रह्मास्त्र ठरली. या एका व्यवहारामुळे पोलिसांना थेट एका संशयिताचा मोबाईल क्रमांक मिळाला आणि तपासाचे चक्र वेगाने फिरले.

टोल नाक्यावरील उच्च क्षमतेच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी या वाहनाचे आणि त्यातील प्रवाशांचे स्पष्ट चेहरे टिपले होते.

# जागतिक बाजारपेठांमध्ये कमजोरीचे संकेत!

## आशियाई बाजारात संमिश्र व्यवहार

**मुंबई ।** क्रूड ऑइलच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे आज जागतिक बाजारपेठांमध्ये कमजोरीचे संकेत मिळत आहेत. मात्र, मागील सत्रात अमेरिकन बाजार मजबूत स्थितीत बंद झाले होते, तरीही आज डाऊ जोन्स फ्युचर्स घसरणीसह व्यवहार करताना दिसत आहे. युरोपीय बाजार मागील सत्रात कमजोरीसह बंद झाले होते. तर आज आशियाई बाजारात संमिश्र व्यवहार सुरू आहेत.

मागील सत्रात अमेरिकन बाजार वाढीसह बंद झाले होते. डाऊ जोन्स इंडस्ट्रियल व्हरेज ०.०२ टक्क्यांच्या सांकेतिक वाढीसह ४९,६०९.१६ अंकांच्या पातळीवर बंद झाला होता. दुसरीकडे, आर्टिफिशियल इंटेलिजन्सशी संबंधित शेअर्समध्ये झालेल्या तेजीमुळे एस अँड पी ५०० इंडेक्स आणि नॅस्डॅक यांनी विक्रमी उच्चांक गाठला. एस अँड पी ५०० इंडेक्स ०.८४ टक्क्यांच्या मजबुतीसह ७,३९८.९३ अंकांच्या पातळीवर बंद झाला. त्याचप्रमाणे, नॅस्डॅक ४४०.८८ अंक म्हणजेच १.७१ टयांनी उसळी घेत २६,२४७.०८ अंकांच्या पातळीवर मागील सत्राचा व्यवहार संपवला. मात्र, आज डाऊ जोन्स फ्युचर्स १०६.८४ अंक म्हणजेच ०.२२ टक्क्यांच्या घसरणीसह ४९,५०२.३२ अंकांच्या पातळीवर व्यवहार करताना दिसत आहे. युरोपीय बाजारात मागील सत्रात सातत्याने विक्रीचा दबाव कायम राहिला. एफटीएसई इंडेक्स ०.४३ टक्क्यांच्या कमजोरीसह १०,२३३.०७ अंकांच्या पातळीवर बंद झाला. त्याचप्रमाणे, सीएसी इंडेक्स १८६.८५ अंक म्हणजेच २.३० टक्क्यांनी घसरून ८,११२.५७ अंकांच्या पातळीवर बंद झाला. याशिवाय, डीएएक्स इंडेक्स ३२४.९८ अंक म्हणजेच १.३४ टक्क्यांनी घसरून २४,३३८.६३ अंकांच्या पातळीवर बंद झाला. आज आशियाई बाजारात संमिश्र व्यवहार सुरू आहेत. आशियातील नऊ प्रमुख बाजारांपैकी पाच बाजारांचे निर्देशांक वाढीसह हिरव्या चिन्हात व्यवहार करत आहेत, तर चार निर्देशांक घसरणीसह लाल चिन्हात दिसत आहेत.

# गॅसचे कनेक्शन मोठ्या संख्येने कापले जाणार!

**नवी दिल्ली ।** इराण अमेरिका युद्धाने अनेक देशात खळबळ उडाली आहे. भारतावर देखील याचा मोठा परिणाम झाला आहे. इंधन, एलपीजीच्या दरात मोठी वाढ होत आहे. होर्मुज खाडी बंद असल्याने कच्चे तेल आणि एलपीजीची वाहतूक जवळपास ठप्प आहे. भारतात एलपीजी गॅसचा मोठा तुटवडा आहे. अशातच आता एलपीजीच्या काही नियमात बदल करण्यात आला.

यामध्ये ज्यांचे वार्षिक उत्पन्न दहा लाख रुपये किंवा त्याहून अधिक आहे, अशा ग्राहकांना एलपीजी सिलिंडरवर अनुदान मिळणार नाही. याचा अर्थ असा आहे की, घरगुती सिलेंडर अधिक पैसे देऊन खरेदी करावे लागणार आहे. तेल कंपन्यांनी देशभरातील दहा लाख रुपये किंवा त्याहून अधिक उत्पन्न असलेल्या ग्राहकांची माहिती संकलित केली आहे. याबाबत त्यांना मेसेजही पाठवला जाईल. एलपीजी गॅस सिलेंडरच्या तुटवड्यादरम्यान तेल कंपन्यांकडून मोठे निर्णय घेतले जात आहेत.यापूर्वी अनेक ग्राहक १० लाखांपेक्षाही अधिक उत्पन्न असतानाही सवलतीचा फायदा घेत आहे, मात्र, आता याला आळा बसणार आहे. याव्यतिरिक्त, मृत आणि बनावट खातेधारकांना ओळखले जात आहे. त्यांची चौकशी करून त्यांचे कनेक्शन्स कायमस्वरूपी बंद केली जात आहेत.

# अमेरिका-इराण तणाव पुन्हा पेटणार!

## डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणचा युद्धविराम प्रस्ताव फेटाळला

**नवी दिल्ली ।** अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेला तणाव पुन्हा एकदा वाढताना दिसत आहे. युद्धविरामासंदर्भात इराणने अमेरिकेच्या नव्या प्रस्तावाला पाकिस्तानमार्फत उत्तर पाठवले आहे. मात्र अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हा प्रस्ताव तत्काळ फेटाळून लावत तो पूर्णपणे अस्वीकार्य असल्याचे म्हटले. तथापि, प्रस्तावातील कोणत्या बाबींवर अमेरिकेची आक्षेपार्ह भूमिका आहे, हे त्यांनी स्पष्ट केले नाही.

इराणने म्हटले आहे की, त्यांना केवळ तात्पुरता नव्हे तर कायमस्वरूपी युद्धविराम हवा आहे. संघर्ष फक्त इराणपुरता मर्यादित न राहता लेबनॉनसह संपूर्ण प्रदेशात शांतता प्रस्थापित व्हावी, अशी तेहरानची मागणी आहे. तसेच समुद्री व्यापार आणि तेलपुरवठ्याच्या मार्गांची सुरक्षा सुनिश्चित करण्याचीही इराणची भूमिका आहे. अमेरिकेच्या प्रस्तावात युद्ध समाप्त करणे, रणनीतिकदृष्ट्या महत्त्वाच्या होर्मुज सामुद्रधुनीला पुन्हा सुरू करणे आणि इराणच्या अणुकार्यक्रमावर मर्यादा आणण्याच्या अटींचा समावेश होता. होर्मुज सामुद्रधुनीला जगातील तेल आणि गॅस पुरवठ्यासाठी सर्वात महत्त्वाचा समुद्री मार्ग मानले जाते. दरम्यान, ट्रम्प यांनी सोशल मीडियावर इराणवर टीका करताना म्हटले की, तेहरान गेली ४७ वर्षे अमेरिकेसोबत खेळ करत आहे, पण आता ते सहन केले जाणार नाही. संयुक्त राष्ट्रांतील अमेरिकेचे राजदूत माइक वॉल्ट्झ यांनी सांगितले की, अमेरिका पुन्हा युद्ध



सुरू करण्यापूर्वी राजनैतिक प्रयत्नांना पूर्ण संधी देऊ इच्छिते. दुसरीकडे, इराणचे नवे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनेई यांनी युद्धाच्या पार्श्वभूमीवर लष्कराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. सरकारी माध्यमांनुसार त्यांनी शत्रूंविरोधात कठोर आणि निर्णायक कारवाई सुरू ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. याचदरम्यान, खाडी प्रदेशातील ड्रोन हल्ल्यांमुळे तणाव आणखी वाढला आहे. कतारजवळ एका जहाजाला ड्रोन हल्ल्यामुळे आग लागली, तर संयुक्त अरब अमिराती आणि कुवेत यांनी आपल्या हवाई क्षेत्रात संशयास्पद ड्रोन दिसल्याचे सांगितले. यूएईने दावा केला की त्यांनी दोन ड्रोन पाडले असून त्यासाठी इराणला जबाबदार धरले आहे. मात्र या घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही. कतारने जहाजावरील हल्ला अत्यंत धोकादायक असल्याचे म्हटले असून त्यामुळे समुद्री व्यापार आणि आवश्यक पुरवठ्यावर धोका निर्माण झाल्याचे सांगितले आहे.

cmyk

## संपादकीय

# योगक्षेमं वहाम्यहम...

मंत्रालयापासून जिल्हा परिषदेपर्यंत... सरकारी शाळेपासून राज्य वीज मंडळापर्यंत आणि याशिवायही कुठे कुठे, सरकारी नोकरीमध्ये एकदा का संधी मिळाली की तेथेच वयाच्या ५८व्या वर्षांपर्यंत नोकरी करायची नि चांगल्या निवृत्तीवेतन ानिशी निवृत्त व्हायचे हा महाराष्ट्रासह देशभरातील लोकप्रिय शिरस्ता. हा शिरस्ता लोकप्रिय होण्यामागची महत्त्वाची कारणे दोन. एक – निवृत्तीपर्यंत कायमस्वरूपी नोकरीची हमी आणि दुसरे – निवृत्तीनंतरचे निवृत्तीवेतन. निवृत्तीपर्यंत कायमस्वरूपी नोकरीची हमी ही आजच्या काळातील दुर्मीळ गोष्ट. गेल्या सुमारे २५–३० वर्षांपासून कंत्राटी नोकरी हीच रूढ रीत झाल्याने कायमस्वरूपी नोकरी ही बाब आजच्या काळात अक्षरश: उंबराच्या फुलाइतकी दुर्मीळ; आणि निवृत्तीवेतन तर बहुसंख्यांच्या विचारविश्वाच्याही पलीकडचे! पण, ज्या सुदैवी लोकांच्या विचारविश्वात हे निवृत्तीवेतन आहे अशा राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी राज्य सरकारने बुधवारी काढलेला जीआर ही महत्त्वाची भेट आहे. राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीत सुधारणा करून आखलेली नवीन सुधारित निवृत्तीवेतन योजना ही ती भेट. सन २००५ नंतर राज्य सरकारी सेवेत आलेले कर्मचारी–अधिकारी यांना ही योजना लागू असेल. बँकांमधील घटलेले व्याजदर, आर्थिक अनिश्चितता आदीच्या पार्श्वभूमीवर निवृत्तांसाठी निवृत्तीवेतन किती जिव्हाळ्याचा विषय असेल, याची कल्पना यावी.

वास्तविक सन २००४पर्यंत लागू असलेल्या निवृत्तीवेतनातील तरतुदी याच प्रकारच्या होत्या. मात्र ती योजना बंद झाली. त्यानंतरच्या नव्या योजनेबाबत कर्मचाऱ्यांचे, संघटनांचे अनेक आक्षेप होते. त्यामुळे जुनीच योजना लागू करण्यासाठी अधेमधे आंदोलनेही झाली. गेल्या लोकसभा निवडणुकीवेळी महाराष्ट्रात जुनी योजना लागू करण्याचे आश्वासन देखील देण्यात आले होते; मात्र हालचाल काहीच झाली नाही. अगदी गेल्याच महिन्यात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी केलेल्या संपामागील सर्वांत प्रमुख मागणी हीच होती. त्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार ती जवळपास पंधरवड्यातच मान्य झाली आहे. जे कर्मचारी ही ऐच्छिक योजना स्वीकारतील त्यांना निवृत्तीवेळी पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरणाकडे जमा असलेल्या रकमेपैकी ६० टक्के निधी सरकारला परत करावा लागेल. संबंधित कर्मचाऱ्याच्या निधनानंतर या रकमेच्या आधारे त्याच्या कुटुंबाला निवृत्तीवेतन मिळेल. या अटीबाबत काही घटकांनी नाराजी नोंदवत आक्षेप घेतलेला दिसतो. मात्र त्यास असलेला विरोध फार रेटला जाईल, अशी शक्यता कमीच. या निवृत्तीवेतन योजनेचे स्वागत करतानाच काही मुद्दे उभे राहतात. त्यातला पहिला आहे तो सरकारी तिजोरीवरील भाराचा. आजमितीला कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्तीवेतन आणि कर्जावरील व्याज यांवर राज्याच्या वार्षिक महसुलातील सुमारे ५५ टक्के इतकी रक्कम खर्च होत आहे. या नव्या योजनेमुळे त्यात भर पडणार. त्यासाठी राज्याला आर्थिक उत्पन्नाचे अधिकचे स्रोत शोधणे, वाढवणे अपरिहार्य; अन्यथा, एकास देताना दुसऱ्याच्या खिशाला हात घालण्याचा अव्यापारेषु व्यापार करावा लागायचा. त्यात आठव्या वेतन आयोगाचे पडघम वाजू लागले आहेत. राज्यात वर्षाला साधारण तीन टक्के राज्य कर्मचारी निवृत्त होत असतात. त्यातून रिक्त होणाऱ्या जागांवर तेवढ्या वेगाने भरती होत नाही. त्याचा फटका अर्थातच प्रशासनास बसतो. त्यावरही तोडगा काढायला हवा. आणि या सगळ्या पल्याडचा मुद्दा एकुणातच आपल्याकडील सामाजिक सुरक्षेचा – विशेषत: वयस्करांच्या सामाजिक सुरक्षेचा. ठरावीक वयानंतर सरकारी कर्मचारी निवृत्त होतात, त्यांना निवृत्तीवेतन मिळते. पण या संघटित वर्तुळापल्याडच्या कोट्यवधी जनांसाठी ही सोय नाही. त्यातील कित्येकांचे तर पोट हातावर. अशांसाठी केंद्र, राज्य यांच्या कल्याणकारी योजना आहेत; मात्र सध्याचे महाग झालेले जगणे पाहता या योजना पुरेशा ठरत नाहीत. जीडीपीचे आकडे, अमूक ट्रिलियनची अर्थव्यवस्था, जागतिक क्रमवारीत इतका क्रमांक वगैरे बाबी महत्त्वाच्या आहेतच, पण हे सारे घडवणारे असंघटित हातदेखील तितकेच महत्त्वाचे आहेत. त्या हातांनाही तेवढीच साथ द्यायला हवी. निवृत्त सरकारी कर्मचाऱ्यांसाठी निवृत्तीवेतन म्हणजे जणू, योगक्षेमं वहाम्यहम्... अशा हमीचा आधारच; असाच आधार इतरांनाही मिळावा, ही अपेक्षा.

# बुवाबाजीची बजबजपुरी

गेल्या दोन महिन्यांमध्ये महाराष्ट्रात पंधरापेक्षा जास्त भोंदू बाबा–बुवांना अटक झाली आहे. जादूटोणा विरोधी कायद्याअंतर्गत एका पाठोपाठ एक इतक्या भोंदू बाबा–बुवांवर कारवाई होण्याची ही कदाचित पहिलीच वेळ असेल. यामध्ये महाराष्ट्राच्या बहुतांश भौगोलिक भागांत कारवाया झाल्या आहेत. ग्रामीण भागासोबतच मोठ्या शहरांमध्येदेखील या कारवाया झाल्या आहेत. सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे यामध्ये हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन अशा सर्व प्रकारच्या बाबा–बुवांचा समावेश आहे.

महाराष्ट्र पोलिसांनी इथेच न थांबता मजबूत आरोपपत्र दाखल करणे आवश्यक आहे. हे बाबा–बुवा जामिनावर सुटून आपले दरबार इतर कुठे भरवणार नाहीत, हे पाहणे आवश्यक आहे. महाराष्ट्र अंनिसने खरात प्रकरण बाहेर आल्यानंतर लोकांसाठी तक्रार करायला हेल्पलाइन सुरू केली होती. तिच्यावर येणाऱ्या तक्रारींचा ओघ बघितला तर या पंधरा केसेस हिमनगाचे टोक वाटाव्यात इतक्या कमी आहेत. आपण डोळे उघडे ठेवून बघायचे ठरवले तर आपल्या हे सहज लक्षात येऊ शकते की, महाराष्ट्रातील साधारण ३५८ तालुके आणि ४३,००० च्या आसपास गावे यांचा विचार केला तर त्यामध्ये एकही तालुका आणि एकही गाव असे सापडणार नाही की जे जाहीररीत्या हे सांगू शकेल की आमच्या गावात भोंदू बाबा–बुवा नाही! डिजिटल माध्यमांतून गाव, जिल्हा आणि राज्य यांच्या सीमारेषा पार केलेले भोंदू बाबा–बुवा यांची गणती तर यापेक्षा किती तरी मोठी आहे! या पार्श्वभूमीवर गेल्या दोन महिन्यांत पंधरा बाबा–बुवांवर कारवाई होणे हे स्वागतार्ह असले तरी अजिबात पुरेसे नाही. महाराष्ट्रात माजलेली बुवा–बाबांची बजबजपुरी आपल्याला संपवायची असेल तर राज्यकर्ते, पोलिस दल, माध्यमे, सामान्य नागरिक आणि अंनिससारख्या संघटना यांना एकत्रितरीत्या मोठ्या प्रमाणात काम करावे लागेल.

राज्यकर्त्यांपासून आपण सुरुवात करू या. लोकांना फसवणाऱ्या बहुतांश बाबा–बुवांवर राजकीय वरदहस्त असल्याने त्यांच्याविषयी तक्रारी करण्यासाठी लोक पुढे येत नाहीत आणि तक्रारदार पुढे आला तरी राजकारण्यांकडून पोलिसांवर दबाव टाकून तपास थांबवला जातो, हे आपल्या इथले सार्वत्रिक वास्तव आहे. गेल्या महिन्यात अटक झालेल्या मनोहरमामाचे उदाहरण बोलके आहे. पाच वर्षांपूर्वी बलात्काराच्या गुन्ह्यामध्ये या इसमाला अटक झाली होती. त्यामध्ये राजकीय वरदहस्त वापरून तो जामिनावर बाहेर आला आणि त्याच जिल्ह्यातील दुसऱ्या गावात त्याने आपले बस्तान बसवले. खरात बाबा आणि बाकीच्या बाबांची अटक हे सगळे महाराष्ट्रात रोज गाजत असतानाच बागेश्वर धाम नावाचा एक बाबा नुकताच महाराष्ट्रात येऊन गेला. केवळ चिठ्ठीवरून माणूस ओळखणे अशा स्वरूपाचे अनेक चमत्काराचे दावे हा बागेश्वर धाम बाबा करतो. या विषयी असंख्य पुरावे ऑनलाइन उपलब्ध आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने सातत्याने त्याच्यावर कारवाई करण्यासाठी आवाज उठवला आहे. तो चमत्कार म्हणून ज्या गोष्टी करतो, त्या गोष्टी महाराष्ट्र अंनिसचे अनेक कार्यकर्ते आणि सलोनी शहासारखे अनेक जादूगार करून दाखवतात. त्या मागची ट्रिकदेखील लोकांना समजावून सांगतात. बागेश्वरबाबा जे करतो, ते जादूटोणा विरोधी कायद्याचे थेट उल्लंघन आहे. तरी देखील त्याच्यावर कारवाई होत नाही. आपला तो आध्यात्मिक गुरू आणि बाकीचे ते भोंदू, अशी सोयीस्कर भूमिका सत्ताधारी राजकारणी ठेवणार असतील तर स्वाभाविकपणे या बुवाबाजीविरोधी लढ्याला निर्णायक टोक येणे अशक्य आहे.

जादूटोणाविरोधी कायद्याअंतर्गत पंधराशेपेक्षा अधिक भोंदू बाबा–बुवा यांना तुरुंगाची हवा खायला लागली असली तरी या कायद्याच्या सध्याच्या रूपात अनेक चांगले बदल करणे आवश्यक आहे. भोंदू ज्योतिषांना जादूटोणा विरोधी कायद्याच्या कक्षेत आणणे ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट होऊ शकते. अनेक भोंदू हे ज्योतिषाच्या नावाखाली करणी, भानामती उतरवणे यांविषयी सल्ला देताना दिसतात. वर्तमानपत्रांत मोठमोठ्या जाहिराती देऊन हे धंदे सुरू असतात. खरातकडे देखील लोक सुरुवातीला ज्योतिषाच्या माध्यमातून जात होते, हे आपण लक्षात घ्यायला पाहिजे.

सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमातून होणारा अंधश्रद्धांचा प्रसार आणि प्रचार रोखण्यासाठी जादूटोणाविरोधी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करता येऊ शकतो, अशा स्वरूपाचा निर्णय उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने देऊन चारपेक्षा अधिक वर्षे झाली आहेत. या संदर्भात तक्रार करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने स्वतंत्र ट्रिब्युनल करावे, अशी सूचनादेखील उच्च न्यायालयाने केली आहे. प्रत्यक्षात त्याविषयी सरकारने शून्य कारवाई केली आहे. खरात प्रकरणाला दोन महिने उलटून गेले तरी जादूटोणा विरोधी कायद्याचे गेल्या बारा वर्षांमध्ये रखडलेले नियम करायला सरकारला अजून वेळ झालेला नाही. कायद्याअंतर्गत तरतूद असलेल्या दक्षता अधिकारी दर्जाच्या पोलिस अधिकाऱ्यांना कार्यान्वित करणे हे देखील एक अत्यंत महत्त्वाचे काम आहे. जादूटोणाविरोधी कायद्याअंतर्गत असलेले दक्षता अधिकारी त्यांच्या भागातील भोंदूगिरी करणाऱ्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करू शकतात. याचा प्रभावी वापर केल्याने अनेक गोष्टी साध्य होऊ शकतात. सरकारनेच जीआर काढून प्रत्येक पोलिस ठाण्यात सुरू करणार म्हणून सांगितलेले अंधश्रद्धाविरोधी कक्ष ही देखील अशीच एक गोष्ट आहे. अशा बाबा–बुवांचे आजूबाजूला असणे उघड गुपित असले तरी अनेक वेळा समाजातील लोक पुढे यायला घाबरतात. त्यांची स्थानिक परिसरात असलेली दहशत हे त्यामागचे महत्त्वाचे कारण असते. अशा वेळी उघडपणे बुवाबाजी करणाऱ्या व्यक्तींवर पोलिसांनी स्वत: पुढाकार घेऊन गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे. अनेक वेळा आरोपपत्रामध्ये त्रुटी राहतात आणि हे भोंदू तुरुंगातून बाहेर येऊन परत आपला धंदा सुरू करतात. त्यासाठी पोलिसांचे प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. राज्य सरकारची यामध्ये महत्त्वाची भूमिका असली तरी सगळ्या गोष्टी केवळ सरकारच्याच मार्फत होतील आणि त्यांनीच त्या केल्या पाहिजेत, अशा भ्रमात जनतेने राहणे योग्य नाही. आपले प्रश्न सोडवण्यासाठी कुठल्याही भोंदू बाबा– बुवांचा आधार घेण्याऐवजी शास्त्रीय पद्धतीने आपल्या अडचणींना सामोरे जाणे आवश्यक आहे. अंनिस कार्यकर्त्यांना अनेक वेळा असा अनुभव येतो की फसवले गेलेले लोक तक्रार करण्याची वेळ येताच माघार घेतात. आपली फसवणूक झाली असेल तर न लाजता आणि न घाबरता तक्रार दाखल करण्यासाठी पुढे येणे हेदेखील अत्यंत महत्त्वाचे आहे. अन्य हजारो, लाखो लोकांची फसवणूक आणि शोषण टाळण्यासाठी हे गरजेचे आहे. प्रिंट व डिजिटल माध्यमांमधून अंधश्रद्धा पसरवणाऱ्या गोष्टींच्या जाहिराती सर्रास केल्या जातात, ते देखील थांबणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात माजलेली ही बुवाबाजीची बजबजपुरी संपवायची असेल तर सरकार, माध्यमे आणि जनता या सर्वांनी अंधश्रद्धा संपवण्यासाठी जागरूक होऊन पुढे येणे गरजेचे आहे; कारण महाराष्ट्राची ओळख पुरोगामी महाराष्ट्र अशी आहे; बुवाबाजीचा महाराष्ट्र अशी नव्हे.

दैनिक व्याघ्र शौर्यम

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शेख रहीम शेख बाबू यांनी लोकशाही ऑफसेट एम–६९, एमआयडीसी जळगाव येथे छापून इस्लाम पुरा, जामनेर, जळगाव, महाराष्ट्र – ४२४२०६ येथे प्रसिद्ध केले. आर.एन.आय.नं. MHMAR/25/A2382

printed by the owner, printer, publisher, editor Sheikh Rahim Sheikh Babu at Lokshahi Offset M-69, MIDC Jalgaon and published at Islam Pura, Jamner, Jalgaon, Maharashtra - 424206. R.N.I. No. MHMAR/25/A2382

# एकला चलो ना रे...

तब्बल ३४ वर्षांचा, डाव्या पक्षांचा पश्चिम बंगालमधील सत्तेचा अभेद्य गड तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी उद्ध्वस्त करतील, असे सन २०११मध्ये किती जणांना वाटले होते? आणि आत्ता, त्याच ममता बॅनर्जी यांची मुख्यमंत्रिपदाची खुर्ची भारतीय जनता पक्ष खेचून घेईल, असे तरी किती जणांना वाटले होते? एकेकाळी भाजपचे श्रेष्ठ नेते अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील एनडीएच्या मंत्रिमंडळात रेल्वे खाते भूषविणाऱ्या ममता बॅनर्जी या नंतर भाजपशी उभा दावा मांडतील, असे किती जणांना वाटले होते? आणि ज्या शुभेंदू अधिकारी यांच्यावर आपण भ्रष्टाचाराच्या आरोपांची राळ उठवली होती तेच शुभेंदू आपल्याच पक्षाचा झेंडा हातात घेऊन मुख्यमंत्री होतील, असे तरी भाजपमधील किती जणांना वाटले होते? यातील पहिल्या दोन प्रश्नांच्या उत्तरांवर मतभेद होतील; तर पुढचे दोन प्रश्न अनेकांस बावळट वाटू शकतील, हे आजचे राजकीय वास्तव.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातील अनेक मंत्री, देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आणि हजारो भाजप कार्यकर्त्यांची उपस्थिती, हा विजय भाजपसाठी किती महत्त्वाचा आहे, हे दर्शवतो. या सगळ्याकडे उपरोल्लेखित राजकीय वास्तवाच्या पार्श्वभूमीवर पाहायला हवे. पश्चिम बंगालच्या भोवतालच्या टापूत कमळाचे भरघोस पीक येत असताना वंगभूमीत मात्र पक्षाला अपेक्षित यश मिळत नव्हते. अत्यंत आक्रमक ममता बॅनर्जी हे त्यामागचे कारण. तरीही भाजपने हार न मानता ममतांशी कडवा संघर्ष सुरू ठेवला. दहा वर्षांच्या कालावधीत एक आकडी आमदारसंख्येवरून २०७वर घेतलेली हनुमानउडी हे त्या संघर्षाचे घसघशीत यशोफल. त्यास निवडणूक आयोग, अन्य केंद्रीय यंत्रणा यांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष हातभार नाही, असे कुणीही सुज्ञ व्यक्ती म्हणणार नाही! त्याच वेळी, धार्मिक ध्रुवीकरणाचे प्रयत्न भाजपने केले असे म्हणावे, तर त्यासाठीची सुपीक जमीन खुद्द बॅनर्जी यांनीच तयार केली, हे कसे नाकारणार? बांगलादेशी घुसखोरांबाबत ममतांची भूमिका ही कुंपणावरच्या मतदारांना आपसूकपणे भाजपच्या टापूत ढकलणारी ठरली, हेही कसे नाकारणार? अर्थात, आता हा इतिहास झाला. निकालाआधीचे वाद, निकालानंतरची रक्तरंजित हिंसा हा देखील इतिहास झाला. वर्तमान अगदी स्पष्ट, स्वच्छ आहे : भाजपचे शुभेंदू अधिकारी हे आता पश्चिम बंगालचे सर्वोच्च अधिकारी झालेले आहेत. त्यामुळे आता चर्चा करायला हवी ती या वर्तमानाची नि भविष्याची.

शुभेंदू हे एकेकाळचे ममतांचे विश्वासू सहकारी. ममतांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांची तृणमूलमध्ये सद्दी वाढू लागल्यानंतर त्यांनी भाजपची कास धरली हे सर्वश्रुतच. विचारांशी निष्ठा वगैरेबाबत न बोललेलेच बरे, अशी आजची स्थिती. मुळात, सामान्यांचे पोट डाव्या विचारांनी भरत नाही, सेक्युलर विचारांनी भरत नाही आणि हिंदुत्ववादी विचारांनीही भरत नाही. पोट भरण्यासाठी लागते रोजगार निर्मिती, उद्योग उभारणी आणि सोबतीला सामाजिक शांतता, सौहार्द. सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असे हे राज्य सध्या आर्थिक कुंठितावस्था सोसत आहे. तेथील उद्योगक्षेत्रात नवे प्राण फुंकणे नितांत गरजेचे झालेले आहे. त्यासाठी खासगी गुंतवणूक अधिकाधिक कशी आकर्षित करता येईल, हे पाहावे लागणार आहे. त्यामुळे एकेकाळी सिंगूर, नंदिग्राम येथील उद्योगांबाबत घेतलेली भूमिका शुभेंदू यांनी अर्थातच गंगेत सोडून दिलेली असणार, ही अपेक्षा! सार्वजनिक वाहतूक, घरबांधणी या क्षेत्रांत देखील राज्याने फार मोठे दिवे लावलेले आहेत, असे नाही. मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांच्यापुढे ही तातडीची प्रमुख आव्हाने असतील. ममतांच्या काळात गुन्हेगारी, खंडणीखोरी वाढल्याचे व त्यात सत्ताधारीच सहभागी असल्याचे अतोनात आरोप झाले. ही विकृत संस्कृती त्यांना कठोरपणे मोडून काढावी लागेल. विकासाची गंगा केवळ शहरांच्याच ओंजळीत पडणार नाही, याचीही काळजी घ्यावी लागेल. त्याचबरोबर मोलाचे असेल ते सगळ्यांना सोबत घेऊन पुढे जाणे. निवडणुकांच्या निमित्ताने उफाळलेली राजकीय आणि धार्मिक कटुता शमवणे यांस त्यांना प्राधान्यक्रम द्यावा लागेल. आपल्या एका प्रख्यात कवितेत, वेगळ्या संदर्भात रवींद्रनाथांनी, एकला चलो रे अशी हाक दिली होती. मात्र, शुभेंदू अधिकारी नि भाजप यांच्यासाठीची ताजी हाक एकला चलो ना रे... अशी आहे; ती ते ऐकतील, ही आशा.

# रुपाली चाकणकरांची तब्बल ६ तास चौकशी!

## भोंदू अशोक खरात प्रकरणात एसआयटीकडून सवालांचा भडिमार

**मुंबई:** राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची भोंदू अशोक खरात प्रकरणात विशेष तपास पथकाने तब्बल सहा तास चौकशी केली. एसआयटीच्या प्रमुख तेजस्वी सातपुते यांनी स्वतः चाकणकरांची सविस्तर चौकशी करत अनेक महत्त्वाचे प्रश्न विचारले. महिला आयोगाच्या अध्यक्षपदावर असताना पदाचा गैरवापर केल्याचा आरोप त्यांच्या विरोधात करण्यात आला आहे.

अशोक खरातसोबतचे संबंध, पूजाविधी, आर्थिक व्यवहार आणि विविध कार्यक्रमांतील फोटो-व्हिडीओ या सर्व मुद्द्यांवर एसआयटीने रुपाली चाकणकरांना धडाधड प्रश्न विचारले. चौकशीदरम्यान भोंदू अशोक खरातला केव्हापासून ओळखता?, खरातसोबत आर्थिक संबंध होते का?, शिवनिका संस्थेतील कामकाज काय होते? तसेच राजकीय नेते मंदिरात कुणाच्या सांगण्यावरून येत होते? अशा अनेक मुद्द्यांवर त्यांची कसून चौकशी करण्यात आली. याशिवाय अशोक खरातसोबत करण्यात आलेले पूजाविधी, संबंधित फोटो आणि व्हिडीओ नेमके कोणत्या कार्यक्रमातील होते, तसेच आर्थिक व्यवहार कोणत्या बँक खात्यांतून झाले याबाबतही माहिती विचारण्यात आली.

एसआयटीसमोर स्पष्टीकरण देताना रुपाली चाकणकर यांनी सांगितले की, त्यांचे कुटुंब वारकरी संप्रदायाशी जोडलेले असून त्यांनी आध्यात्मिक श्रद्धेपोटी अशोक खरात आणि त्यांच्या पत्नीला गुरु मानले होते. माझे आणि अशोक खरातचे कोणतेही आर्थिक संबंध नव्हते. मी कुणालाही त्यांच्याकडे जाण्यासाठी आग्रह केला नाही. खरात यांची दुसरी बाजू मला माहीत नव्हती, असा दावा त्यांनी चौकशीत केला. चौकशीनंतर माध्यमांशी बोलताना रुपाली चाकणकर म्हणाल्या, एसआयटीने विचारलेल्या सर्व प्रश्नांची मी समर्पक उत्तरं दिली आहेत. तपास यंत्रणेला जे सहकार्य हवं असेल ते मी पूर्णपणे करणार आहे. चौकशी संदर्भातील सविस्तर माहिती अहवालातून समोर येईल. दरम्यान, या प्रकरणामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, एसआयटीच्या पुढील तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# चोपडा येथे आज प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन

जळगाव ✍ प्रतिनिधी

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जळगाव यांच्या मार्फत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चोपडा येथे दि. १२ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजेपासून प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करण्यात आला आहे.

या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये क्रेस क्रोप प्रा. लि. पुणे या नामांकित कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून, इच्छुक उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. या मेळाव्यास १०वी, १२वी, आयटीआय, बी.कॉम., एम.कॉम., ग्रॅज्युएट तसेच इतर पात्रता धारक उमेदवार सहभागी होऊ शकतात. इच्छुक उमेदवारांनी https://rojgar.mahaswayam.gov.in//home/index या महा स्वयंरोजगार व रोजगार पोर्टल या संकेतस्थळावर नाव नोंदणी केलेली असल्यास आपल्या युजर आयडी व पासवर्डद्वारे लॉग-इन करून उपलब्ध रिक्त पदांसाठी अर्ज (Apply) करावेत. ज्या उमेदवारांनी अद्याप नाव नोंदणी केलेली नाही त्यांनीही सर्व शैक्षणिक कागदपत्रांसह मुलाखतीच्या दिवशी प्रत्यक्ष उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यासंदर्भात काही अडचण असल्यास अथवा अधिक माहितीसाठी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ९.४५ ते सायं. ६.१५ या वेळेत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, जी.एस. ग्राउंडजवळ, जळगाव येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा किंवा दूरध्वनी क्रमांक ०२५७-२९५९७९० वर संपर्क करावा, असे आवाहन सहायक आयुक्त संदीप ज्ञा. गायकवाड यांनी केले आहे.

# लाडक्या बहिणींना ४ हजार ५०० रुपये मिळणार?

## ई-केवायसी पूर्ण केलेल्या महिलांसाठी खुशखबर

**मुंबई :** राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थ्यांसाठी एक अत्यंत दिलासादायक बातमी समोर येत आहे. ज्या महिलांनी आपली ई-केवायसी प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे, अशा महिलांच्या बँक खात्यात गेल्या तीन महिन्यांचे रखडलेले अनुदान एकत्र जमा होण्याची शक्यता आहे. शासन स्तरावर या हालचालींना वेग आला असून, लवकरच याबाबत अधिकृत घोषणा होऊन पात्र महिलांच्या खात्यात थेट ४ हजार ५०० रुपये जमा होणार आहेत.

महायुती सरकारने जून २०२४ मध्ये ही योजना जाहीर केली होती. सुरुवातीला तब्बल २ कोटी ४७ लाख महिलांनी नोंदणी केली होती. मात्र, अर्जांची छाननी आणि सखोल पडताळणी सुरू झाल्यानंतर लाभार्थ्यांच्या संख्येत मोठी घट झाली. कुटुंबाचे उत्पन्न, सरकारी नोकरी आणि अन्य निकषांच्या आधारे करण्यात आलेल्या तपासणीत अनेक धक्कादायक प्रकार उघड झाले. काही ठिकाणी पुरुषांनीही महिलांच्या नावाने अर्ज केल्याचे समोर आले होते. यामुळे मार्च अखेरपर्यंत ६८ लाख महिलांना अपात्र घोषित करण्यात आले होते. शासनाने अपात्र ठरवलेल्या महिलांना ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त मुदत दिली होती. या मुदतीचा फायदा घेत एप्रिल महिन्यात सुमारे १४ लाख महिलांनी आपली कागदपत्रे अद्ययावत केली. त्यामुळे आता अपात्र महिलांची संख्या ५४ लाखांपर्यंत खाली आली असून, या लाडक्या बहिणींना पुन्हा या योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याच पार्श्वभूमीवर या महिलांना मागील तीन महिन्यांचा थकीत हप्ता एकरकमी देण्याबाबत प्रशासन विचार करत आहे.

दुसरीकडे, तांत्रिक अडचणींमुळे अनेक महिला अद्याप ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करू शकलेल्या नाहीत. अशा महिलांनी आणि विविध जिल्ह्यांतील महिला व बालविकास विभागाच्या कार्यालयांनी शासनाकडे मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे. शासनाने यावर सकारात्मक निर्णय घेतल्यास आणखी अनेक महिलांना योजनेचा लाभ मिळण्याची शक्यता आहे. योजनेतील पात्र महिलांना तीन महिन्यांचे रखडलेले हप्ते एकाच वेळी मिळाल्यास आर्थिक अडचणीत असलेल्या हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळू शकतो.

# जळगावकरांनो सावधान... सुर्य आग ओकु लागला!

## पुढील तीन दिवस उष्णतेची लाट : १५ मेपासून पावसाची शक्यता

**जळगाव** प्रतिनिधी

मे महिन्याच्या तडाखेबंद उन्हाने जळगावकरांची अक्षरशः दमछाक सुरू झाली असून, शहरासह संपूर्ण जिल्हा पुन्हा एकदा तीव्र उष्णतेच्या लाटेच्या विळख्यात सापडला आहे. रविवारी जळगावमध्ये कमाल तापमान ४४.५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले, तर किमान तापमान २८.२ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. यंदाच्या उन्हाळी हंगामातील हे दुसऱ्या क्रमांकाचे उच्चांकी तापमान ठरले असून, वाढत्या उष्णतेमुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. दुपारच्या वेळेत शहरातील प्रमुख रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत असून, उष्णतेच्या झळांपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळल्याचे चित्र आहे.

यंदाच्या हंगामात मे महिन्याच्या सुरुवातीलाच जिल्ह्यात ४४.६ अंश सेल्सिअस या सर्वोच्च तापमानाची नोंद झाली होती. त्यानंतर काही दिवस ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने तापमानात किंचित घट झाली होती आणि पारा ४० अंशांच्या आसपास स्थिरावला होता. मात्र, गेल्या दोन दिवसांत वातावरणात अचानक बदल झाला आणि सूर्याने पुन्हा आग ओकण्यास सुरुवात केली. परिणामी उष्णतेची तीव्रता प्रचंड वाढली असून, सकाळी नऊ वाजल्यापासूनच दुपारसारखे कडक ऊन जाणवू लागले आहे. दिवसाचे तापमान वाढण्याबरोबरच रात्रीच्या उकाड्यानेही नागरिक त्रस्त झाले आहेत. रात्री उशिरापर्यंत गरम वारे वाहत असल्याने घरामध्येही प्रचंड उकाडा



जाणवत आहे. किमान तापमान २८ अंशांच्या पुढे गेल्याने नागरिकांना रात्री झोप घेणेही कठीण झाले आहे. अनेक भागांत रात्री उशिरापर्यंत नागरिक घराबाहेर किंवा गच्चीवर बसून उकाड्यापासून दिलासा मिळवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत.

हवामान विभागाने पुढील तीन दिवसांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. दि. १३ मेपर्यंत जिल्ह्यात कमाल तापमान ४१ ते ४४ अंश सेल्सिअसदरम्यान राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विशेषतः १२ मे रोजी काही भागांत तापमान ४४ अंशांच्या पुढे जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून, प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक कामांशिवाय दुपारच्या वेळेत घराबाहेर पडू नये, असे आवाहन केले आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत उष्णतेची तीव्रता सर्वाधिक असल्याने या वेळेत लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. सध्या शहरातील रस्त्यांवर दुपारच्या वेळेत वाहनांची वर्दळ लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे दिसून येत आहे. चौक, बाजारपेठा आणि सार्वजनिक ठिकाणी नेहमीची गर्दी दिसत नसून, अनेकांनी घरातच राहणे पसंत केले आहे. रस्त्यावर काम करणारे कामगार, हातगाडी व्यावसायिक, फेरीवाले आणि बांधकाम क्षेत्रातील मजूर यांना या उष्णतेचा सर्वाधिक फटका बसत आहे. डोक्यावर कडक ऊन आणि अंगावर तापलेल्या वाऱ्यांमुळे त्यांची परिस्थिती अधिक बिकट झाली आहे.

आरोग्य विभागानेही नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. उष्माघात, निर्जलीकरण, चक्कर येणे, डोकेदुखी आणि थकवा यांसारख्या तक्रारींमध्ये वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. डॉक्टरांनी नागरिकांना भरपूर पाणी पिणे, ताक, लिंबूपाणी, नारळपाणी यांसारखे द्रवपदार्थ घेणे, हलका आहार घेणे आणि उन्हात बाहेर पडताना डोक्यावर कापड किंवा टोपी वापरण्याचा सल्ला दिला आहे. तसेच थेट सूर्यप्रकाशात जास्त वेळ राहणे टाळावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, या उष्णतेमागील कारणांबाबत हवामान तज्ज्ञांनी काही महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली आहेत. उत्तर भारतातील सक्रिय उच्च दाब क्षेत्रामुळे गरम आणि कोरडी हवा दक्षिणेकडे सरकत असल्याने महाराष्ट्रासह खानदेश भागात तापमान झपाट्याने वाढत आहे. त्यातच आकाश पूर्णपणे निरभ्र असल्याने सूर्याची तीव्र किरणे थेट जमिनीवर पडत आहेत. परिणामी जमिनीचे तापमान मोठ्या प्रमाणात वाढून त्यातून उष्णता पुन्हा हवेत सोडली जात आहे. जिल्ह्यातील घटते वनक्षेत्र, वाढते काँक्रिटीकरण आणि ओसाड पडलेली जमीन यांचाही उष्णतेच्या वाढीमध्ये मोठा वाटा असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. शहरांमध्ये झपाट्याने वाढणाऱ्या सिमेंटच्या इमारती आणि रस्ते दिवसाची उष्णता शोषून घेतात आणि रात्री ती पुन्हा वातावरणात सोडतात. त्यामुळे रात्रीच्या तापमानातही वाढ होत असून, उकाडा अधिक तीव्र जाणवत आहे. पर्यावरणातील बदल आणि हवामानातील असंतुलन यामुळे अशा उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र आणि दीर्घकाळ टिकण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या प्रचंड उष्णतेच्या पार्श्वभूमीवर जळगावकरांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्यास सुरुवात झाली असून, मान्सूनपूर्व हालचाली सक्रिय होत आहेत. त्यामुळे वातावरणातील ओलावा हळूहळू वाढू लागला आहे.

**शुक्रवारपासून पावसाची शक्यता**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, दि. १५ मेनंतर जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. या पावसामुळे तापमानात काही प्रमाणात घट होऊन नागरिकांना उष्णतेपासून दिलासा मिळू शकतो. तोपर्यंत मात्र उष्णतेचा तडाखा कायम राहणार असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज आहे. विशेषतः दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे, पुरेसे पाणी प्यावे आणि आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासन आणि आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे. जळगावकर सध्या कडक उन्हाचा सामना करत असले तरी, मान्सूनपूर्व पावसाच्या शक्यतेमुळे येत्या काही दिवसांत वातावरणात बदल होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# कंपनीत काम करणाऱ्या तरुणाचा मृत्यू

## एमआयडीसीतील घटनेने खळबळ : मृत्यू संशयास्पद असल्याचा आरोप

**जळगाव :** एमआयडीसी परिसरातील एका ठिबक निर्मिती कंपनीत काम करणाऱ्या तरुणाचा दुसऱ्या मजल्यावरून पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. दीपक छगन भिल (वय ३५, मूळ रा. खर्डी, ता. चोपडा, ह.मु. एमआयडीसी एस सेक्टर) असे मृत तरुणाचे नाव असून उपचार सुरू असताना त्याची प्राणज्योत मालवली. या घटनेनंतर नातेवाईकांनी मृत्यू संशयास्पद असल्याचा आरोप करत गुन्हा दाखल होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला.

प्राप्त माहितीनुसार, लक्ष्मी ग्रो इंडस्ट्रीज या कंपनीत दीपक भिल कामाला होता. कंपनी परिसरातच तो पत्नी व तीन मुलांसह वास्तव्यास होता. शनिवारी रात्री सुमारे ११ वाजेच्या सुमारास कंपनीच्या दुसऱ्या मजल्यावरून खाली पडल्याने तो गंभीर जखमी झाला. सहकाऱ्यांनी त्याला तात्काळ जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच रविवारी सकाळी दीपकच्या नातेवाईकांनी जळगाव गाठले. त्यानंतर रुग्णालय परिसरात मोठी गर्दी झाली होती. पोलिसांनी आमच्या माहितीशिवाय आणि परवानगी न घेता शवविच्छेदन केल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला. पंचनामा आणि शवविच्छेदन प्रक्रियेबाबत कोणतीही माहिती देण्यात आली नसल्याचा दावा नातेवाईकांनी केला आहे.

# पोलीस अधीक्षक धिवरेंचा जळगावकरांशी थेट संवाद

## समस्यांची ऑन द स्पॉट दखल : ज्येष्ठांची केली चौकशी

**जळगाव :** शहराचे हृदय समजल्या जाणाऱ्या काव्यरत्नावली चौक परिसरात रविवारी संध्याकाळी एक सुखद धक्का देणारे चित्र पाहायला मिळाले. जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी कोणताही बडेजाव किंवा शासकीय प्रोटोकॉल न ठेवता थेट ज्येष्ठ नागरिकांच्या कट्ट्यावर जाऊन त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला. पोलीस प्रमुखांच्या या साध्या आणि थेट संवादामुळे उपस्थित जळगावकर भारावून गेले होते.

सायंकाळच्या वेळी काव्यरत्नावली चौकातील कट्ट्यावर ज्येष्ठ नागरिक आणि परिसरातील रहिवाशांची मोठी गर्दी असते. याच ठिकाणी पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी अचानक भेट दिली. कोणत्याही औपचारिकतेत न अडकता ते थेट नागरिकांच्या घोळक्यात बसले. यावेळी त्यांनी शहरातील कायदा व सुव्यवस्था, रात्रीची गस्त, महिलांची सुरक्षितता आणि वाढत्या वाहतूक समस्यांबाबत नागरिकांचे काय मत आहे, हे जाणून घेतले. संवादादरम्यान नागरिकांनी शहरातील वाहतूक कोंडी, बेदरकार वाहनचालक, तरुणांकडून होणारे ध्वनीप्रदूषण आणि रात्री उशिरापर्यंत सुरू राहणाऱ्या गैरप्रकारांकडे अधीक्षकांचे लक्ष वेधले. नागरिकांनी मांडलेल्या प्रत्येक समस्येची पोलीस अधीक्षकांनी गांभीर्याने दखल घेतली. पोलीस आणि जनता यांच्यात विश्वासाचे नाते असणे ही काळाची गरज आहे. पोलिसांच्या कामात जोपर्यंत नागरिकांचा सहभाग आणि सहकार्य मिळत नाही, तोपर्यंत प्रभावी पोलिसिंग शक्य नाही, असे मत श्रीकांत धिवरे यांनी यावेळी व्यक्त केले. तसेच, पोलिसांशी संबंधित कोणतीही अडचण किंवा तक्रार असल्यास कोणत्याही संकोचाशिवाय थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले. जिल्ह्याच्या सर्वोच्च पोलीस अधिकाऱ्याने अशा प्रकारे कट्ट्यावर बसून समस्या ऐकून घेतल्यामुळे जळगावकरांनी या उपक्रमाचे मोठ्या प्रमाणावर कौतुक केले आहे.

# जागतिक तणावाच्या पार्श्वभूमीवर सरकार लर्ट मोडवर!

## राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली दीड तास बैठक

**नवी दिल्ली :** मध्य पूर्वेतील (पश्चिम आशिया) वाढत्या संघर्षाचे पडसाद संपूर्ण जगभरात उमटत असताना, भारत सरकारने संभाव्य धोके ओळखून अत्यंत सावधगिरीची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. देशांतर्गत परिस्थिती आणि पुरवठा साखळी स्थिर ठेवण्यासाठी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी एका अनौपचारिक अधिकार प्राप्त मंत्रिगटाची एक अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. सुमारे दीड तास सखोल चर्चा झालेल्या या बैठकीत प्रामुख्याने देशाची ऊर्जा सुरक्षा आणि सर्वसामान्यांसाठी आवश्यक असलेल्या जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेवर लक्ष केंद्रित करण्यात आले. या उच्चस्तरीय बैठकीला केंद्रीय आरोग्य व रसायन-खते मंत्री जे. पी. नड्डा, पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्यासह सरकारमधील अनेक महत्त्वाचे मंत्री उपस्थित होते. परदेशातील युद्धजन्य स्थितीमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला बसू शकणाऱ्या संभाव्य धयांचा या वेळी सविस्तर आढावा घेण्यात आला.

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत होणाऱ्या अनपेक्षित वाढीचा थेट परिणाम भारतीय बाजारपेठेवर होऊ नये, यासाठी या बैठकीत महत्त्वपूर्ण धोरणांवर चर्चा झाली. देशात घरगुती



वापराचा एलपीजी गॅस, वाहनांसाठी लागणारे पेट्रोल-डिझेल आणि कृषी क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या खतांचा कोणताही तुटवडा निर्माण होऊ नये, यासाठी तातडीच्या उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. बैठकीनंतर माध्यमांना माहिती देताना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी स्पष्ट केले की, पश्चिम आशियातील सद्यस्थितीमुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची दाट शक्यता असली तरी, देशांतर्गत पातळीवर कोणतीही कमतरता भासू नये याची पूर्ण काळजी घेतली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सज्ज असून, पुरवठा साखळी अबाधित ठेवण्यासाठी सर्व यंत्रणा अतिशय प्रभावीपणे काम करत आहेत. जागतिक पातळीवर तणाव असला तरी देशातील नागरिकांनी विनाकारण घाबरून जाऊन वस्तूंची साठेबाजी करू नये, असे आवाहन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केले आहे. परदेशातून येणाऱ्या पुरवठा साखळीत कोणताही मोठा अडथळा येऊ नये, यासाठी सरकारने आधीच ठोस आणि पर्यायी व्यवस्था निर्माण केली आहे. या जागतिक संकटाचा सामना करण्यासाठी केवळ सरकारी प्रयत्नांवर विसंबून न राहता लोकसहभागही तितकाच महत्त्वाचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

---

# जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेत योगेश धोंगडे चॅम्पियन

**जळगाव :** जळगाव जिल्हा कॅरम असोसिएशनच्या मान्यतेने व जैन स्पोर्टस अकॅडमीच्या सहकार्यातून स्व. डॉ. घनश्याम कोचुरे यांच्या जयंती निमित्तीने जिल्हा मानांकन स्पर्धा दि. ९ ते १० मे दरम्यान कांताई सभागृह येथे घेण्यात आली. दोन दिवस चालेल्या या स्पर्धेत ४५ च्यावर खेळाडूंनी सहभाग घेतला. आठ खेळाडूंनी क्वार्टर फायनलमध्ये पोहचवले होते. त्यातून जैन इरिगेशनचा आंतराष्ट्रीय कॅरमपटू योगेश धोंगडे चॅम्पियन ठरला. त्याने रईस शेखचा २५-१२, १६-१९, २१-१५ असा पराभव करून विजेतेपद प्राप्त केले. विजेत्यांना तब्बल १५ हजारांची रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी डॉ. घनश्याम कोचुरे



मेडिकल फाऊंडेशनचे पराग कोचुरे, जैन स्पोर्टस अकॅडमीचे अरविंद देशपांडे, हबीब इंजीनियर, सैयद मोहसिन, आसिफ शेख उपस्थित होते. पराग कोचुरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, कॅरम खेळाडूंसाठी जैन स्पोर्टस अकॅडमीने उपलब्ध करुन दिलेले व्यासपीठ खूप मोलाचे आहे. यातून चांगले खेळाडू घडत असून उत्कृष्ट खेळ बघायला मिळाला. यावेळी अरविंद देशपांडे यांनी खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी जैन स्पोर्टस अकॅडमी नेहमी अग्रेसर असल्याचे सांगितले. दरम्यान स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यावेळी ॲड. रेखा कोचुरे, तेजस कोचुरे, मंजूर खान यांच्या मान्यवर उपस्थित होते. उपांत्यपूर्व फेरी मध्ये योगेश धोंगडे विरूद्ध अफजल शेख, अयाज शेख विरूद्ध अय्युब खान, नईम अन्सारी विरूद्ध फिरोज खान, मुस्तूफा खान विरूद्ध रईस शेख असे सामने झालेत.

# साकळी येथील एटीएम बंद असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय

मनवेल ता यावल । साकळी गावातील मुख्य चौकात असलेले आयडीबीआय बँकेचे एटीएम बंद असल्याने शेतकरी सह सर्वसामान्य जनतेची मोठी गैरसोय होत असून एटीएम मध्ये कॅश उपलब्ध नसल्याने सर्वत्र गैरसोय होत आहे मनवेल,साकळी ,शिरागड, पथराडे, शिरसाड,थोरगव्हाण सह परिसरातील एकमेव आयडीबीआय बँक असून या बँकेत तेरा गावातील शेतकरी सह सर्वसामान्य जनतेचे व्यवहार सुरळीत सुरू असून एटीएम मशीनद्वारे पैसे काढण्यासाठी ग्राहक केले असता एटीएम मध्ये पैसेच नसल्याने ग्राहकांची मोठी गैरसोय होत आहे सध्या शेतकऱ्यांना केसीसी कर्ज वाटप सुरू असून शेतकऱ्यांना अर्धी रक्कम एटीएम द्वारे काढण्यात सक्ती करण्यात आली आहे तर अर्धी रक्कम बँकेतून मिळत आहे त्यामुळे एटीएम मशीन मध्ये पैसे काढण्यासाठी शेतकरी गर्दी करत आहे मात्र गेल्या तीन दिवसापासून साकळी येथील आयडीबीआय बँकेतील एटीएम मध्ये कॅश नसल्याने एटीएम मशीन बंद आहे त्यामुळे शेतकऱ्यांना नाहक आर्थिक भूदंड सहन करून यावल येथील एटीएम मशीन मध्ये जाऊन केसीसी चे पैसे काढावे लागत आहे एटीएम मशीन मध्ये कॅश उपलब्ध करून शेतकरी सर्वसामान्यांची होणारी गैरसोय दूर करण्यात यावी याकडे संबंधित आणि लक्ष द्यावे अशी मागणी ग्रामीण भागातून होत आहे.

---

# जळगाव पोलिसांची झिरो टॉलरन्स मोहीम; अवैध धंद्यांवर जिल्हाभर धडक कारवाई

**जळगाव :** जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आणि गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी जळगाव पोलीस दलाने आज संपूर्ण जिल्ह्यात धडक झीरो टॉलरन्स मोहीम राबवली. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या थेट मार्गदर्शनाखाली आज पहाटेपासूनच संपूर्ण जिल्ह्यात एकाच वेळी सर्वत्र छापे मारण्यात आले. यात गावठी हातभट्टी, अवैध दारू विक्री (प्रोहिबिशन) आणि सट्टा-जुगाराच्या अड्ड्यांवर कारवाई करत पोलिसांनी अवैध व्यावसायिकांचे कंबरडे मोडले आहे.

**पहाटेपासूनच सर्च अँड डिस्ट्रॉय ऑपरेशन**

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी कडक पावले उचलली आहेत. या मोहिमेअंतर्गत आज पहाटेच पोलिसांची विविध पथके संपूर्ण जिल्ह्यात एकाच वेळी कारवाईसाठी उतरली. छुप्या पद्धतीने चालणाऱ्या हातभट्ट्या, अवैध दारूचे अड्डे आणि सट्टा चालवणाऱ्या जागांवर अचानक छापे टाकण्यात आले. एकाच वेळी संपूर्ण जिल्ह्यात कारवाई झाल्याने गुन्हेगारांना पळून जाण्याची किंवा पुरावे नष्ट करण्याची कोणतीही संधी मिळाली नाही.

**कारवाईचा इम्पॅक्ट: जप्त केलेले साहित्य जनतेसमोरच जाळले**

या कारवाईचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, पोलिसांनी केवळ गुन्हे दाखल करून साहित्य जप्त करण्यावर समाधान मानले नाही, तर या कारवाईचा सर्वसामान्य जनतेवर एक आश्वासक प्रभाव (खारिलीं) पडावा यासाठी वेगळी पद्धत अवलंबली. सट्टा आणि जुगाराच्या अड्ड्यांवरून जप्त केलेले कागदपत्रे, चिठ्ठ्या, बॉक्स आणि



इतर साहित्य पोलिसांच्या पथकाने भर चौकात आणि सार्वजनिक ठिकाणी आणून, नागरिकांना दिसेल अशा पद्धतीने जाळून खाक केले. तसेच, गावठी हातभट्टी आणि प्रोहिबिशनच्या केसेसमध्ये जप्त केलेले दारूचे रसायन आणि साहित्य गावातील लोकांसमोरच मुद्दाम नष्ट करण्यात आले. समाजात या कारवाईचा एक दृश्य आणि सकारात्मक परिणाम दिसावा, हा या मागचा मुख्य हेतू होता.

# जळगाव महानगरपालिकेतील १६ उमेदवारांवर अपात्रतेची टांगती तलवार

## निवडणूक खर्चाचा हिशोब सादर न केल्याने उमेदवार अडचणीत.!

जळगाव प्रतिनिधी

महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर आता अनेक उमेदवारांच्या अडचणी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. निवडणूक लढवलेल्या उमेदवारांपैकी तब्बल सोळा उमेदवारांनी अद्यापही आपला निवडणूक खर्चाचा हिशोब प्रशासनाकडे सादर केलेला नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्यामुळे या उमेदवारांवर अपात्रतेची कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.



महानगरपालिका निवडणुकीत उमेदवारांना ठराविक कालावधीत आपल्या निवडणूक खर्चाचा तपशील सादर करणे बंधनकारक असते. मात्र अनेक उमेदवारांनी ही मुदत संपूनही आपला खर्च सादर न केल्याने प्रशासनाने त्यांना नोटिसा बजावल्या होत्या. या नोटिसांनंतर काही उमेदवारांनी आपला खर्च सादर केला असला तरी अजूनही १६ उमेदवारांनी कोणताही हिशोब प्रशासनाकडे जमा केलेला नाही.

मुख्य लेखा परीक्षक तथा निवडणूक खर्च प्रमुख विजयकुमार सोनवणे यांनी या संपूर्ण प्रकरणाचा सविस्तर अहवाल विभागीय आयुक्तांकडे सादर केला आहे. या अहवालानंतर संबंधित उमेदवारांवर अपात्रतेची कारवाई होण्याची शक्यता अधिक बळावली आहे. निवडणूक प्रक्रियेमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी खर्चाचा तपशील सादर करणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. मात्र काही उमेदवारांनी या नियमांकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.

महानगरपालिका निवडणुकीत एकूण २४ उमेदवारांनी सुरुवातीला खर्चाचा हिशोब सादर केला नव्हता. प्रशासनाने नोटीस बजावल्यानंतर त्यापैकी आठ उमेदवारांनी निर्धारित कालावधीत आपला खर्च सादर केला. मात्र उर्वरित सोळा उमेदवारांनी अद्याप कोणताही प्रतिसाद दिलेला नसल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणामुळे आता संबंधित उमेदवारांची राजकीय अडचण वाढण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार खर्चाचा तपशील न सादर करणाऱ्या उमेदवारांवर अपात्रतेसह इतर प्रशासकीय कारवाई होऊ शकते. त्यामुळे पुढील काही दिवसांत प्रशासन कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जामनेरमध्ये विजेचा शॉक लागून पडल्याने तरुण मजुराचा मृत्यू

**जळगाव :** जामनेर येथील वीज वितरण कंपनीच्या (महावितरण) कार्यालयासमोरच एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. वीज खांबावर दुरुस्तीचे काम करत असताना विजेचा जोरदार धक्का लागून एका तरुण मजुराचा जागीच मृत्यू झाला. सागर इंगळे (वय २०) असं मयत तरुणाचं नाव आहे सागर इंगळे हा तरुण एका कंत्राटदाराकडे मजूर म्हणून कार्यरत होता, रविवारी रात्री जामनेर वीज कार्यालयाजवळ असलेल्या बीज खांबावरील दुरुस्तीचे काम त्याला देण्यात आले होते. कामाला सुरुवात करण्यापूर्वी खबरदारी म्हणून मुख्य रोहित्राचा (ट्रांसफॉर्मर) वीज पुरवठा खंडित करण्यात आला होता. मात्र, ज्या खांबावर दुरुस्ती करायची होती, तिथे गावातील स्ट्रीट लाईट आणि रोहित्र असे दोन स्वतंत्र कट पॉईंट होते.



मुख्य पुरवठा बंद केला असला तरी स्ट्रीट लाईटचा वीज प्रवाह तांत्रिक कारणास्तव सुरूच होता, ज्याची कल्पना कोणालाही आली नाही. सागर कामासाठी खांबावर चढला असता, त्याला अचानक सुरू असलेल्या स्ट्रीट लाईटच्या तारांचा जोरदार धक्का लागला. हा धक्का इतका भीषण होता की, सुमारे नऊ मीटर उंचीवरून तो थेट जमिनीवर फेकला गेला. खांबाजवळच असलेल्या दगडावर डोके आदळल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याला तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# विद्यार्थ्यांनी शारीरिक तंदुरुस्तीसाठी खेळाकडे वळावे - एपीआय प्रमोद कठोरे

## पहूर येथे शौर्य स्पोर्टच्या खेळाडूंना ब्लॅक बेल्टचे वितरण

**पहूर, ता. जामनेर :** आरोग्य हीच खरी संपत्ती असून विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातच आपल्या शारीरिक तंदुरुस्तीसाठी विविध खेळांकडे वळाले पाहिजे, असे प्रतिपादन पहूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद कठोरे यांनी केले. महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या प्रांगणात शौर्य स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे आयोजित बेल्ट वितरण सोहळ्यात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले शिक्षण संस्थेचे संचालक शंकर घोंगडे हे होते. प्रारंभी मान्यवरांचा अकॅडमीतर्फे स्नेहवस्त्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



प्रास्ताविक शौर्य स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक हरिभाऊ राऊत यांनी केले. सूत्रसंचालन शंकर भामेरे यांनी केले. यावेळी मोहिनी राऊत, माहेश्वरी धनगर, हर्षदा उबाळे, स्वाती चौधरी, वेदांत क्षीरसागर, यश राऊत, दिनेश राऊत, हरीश घाटे, ईश्वर क्षीरसागर, भूषण मगरे, भावेश निकम, माहेश्वरी धनगर आणि गौरी कुमावत ,सतीश क्षीरसागर या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते ब्लॅक बेल्ट प्रदान करण्यात आले.

# पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांचा जळगावकरांशी थेट संवाद

## समस्यांची घेतली ऑन द स्पॉट दखल

**जळगाव :** जळगाव शहराचे हृदय समजल्या जाणाऱ्या काव्यरत्नावली चौक परिसरात रविवारी संध्याकाळी एक सुखद धक्का देणारे चित्र पाहायला मिळाले. जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी कोणताही बडेजाव किंवा शासकीय प्रोटोकॉल न ठेवता थेट ज्येष्ठ नागरिकांच्या कट्ट्यावर जाऊन त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला. पोलीस प्रमुखांच्या या साध्या आणि थेट संवादामुळे उपस्थित जळगावकर भारावून गेले होते.

सायंकाळच्या वेळी काव्यरत्नावली चौकातील कट्ट्यावर ज्येष्ठ नागरिक आणि परिसरातील रहिवाशांची मोठी गर्दी असते. याच ठिकाणी पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी अचानक भेट दिली. कोणत्याही औपचारिकतेत न अडकता ते थेट नागरिकांच्या घोळक्यात बसले. यावेळी



त्यांनी शहरातील कायदा व सुव्यवस्था, रात्रीची गस्त, महिलांची सुरक्षितता आणि वाढत्या वाहतूक समस्यांबाबत नागरिकांचे काय मत आहे, हे जाणून घेतले. संवादादरम्यान नागरिकांनी शहरातील वाहतूक कोंडी, बेदरकार वाहनचालक, तरुणांकडून होणारे ध्वनीप्रदूषण आणि रात्री उशिरापर्यंत सुरू राहणाऱ्या गैरप्रकारांकडे अधीक्षकांचे लक्ष वेधले. नागरिकांनी मांडलेल्या प्रत्येक समस्येची पोलीस अधीक्षकांनी गांभीर्याने दखल घेतली.

# हिरापूर रोडवरील १३२ केव्ही सब स्टेशनला शॉर्टसर्किटमुळे आग

**जळगाव :** हिरापूर रोडवरील १३२ केव्ही सब स्टेशन येथे रविवार दि. १० मे रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास अचानक शॉर्टसर्किट झाल्याने आग लागल्याची घटना घडली. सब स्टेशनमधील आगीच्या ठिणग्या खाली असलेल्या गवतावर पडल्याने आग वेगाने पसरली. त्यानंतर कंपाउंडच्या बाहेर ठेवलेल्या लाकडालाही आग लागून मोठ्या प्रमाणात धूर व ज्वाळा उसळल्या. घटनेची माहिती मिळताच माजी नगरसेवक प्रशांत राजपूत यांनी तात्काळ चाळीसगाव नगरपरिषद अग्निशमन दलाशी संपर्क साधला. अग्निशमन दलाच्या दोन वाहनांनी घटनास्थळी



धाव घेत पाण्याच्या सहाय्याने आग आटोक्यात आणली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेमुळे चाळीसगाव तालुक्यातील अनेक भागातील वीजपुरवठा दीड ते दोन तासांसाठी बंद करण्यात आला होता. आग पूर्णपणे नियंत्रणात आल्यानंतर वीजपुरवठा पुन्हा सुरळीत करण्यात आला. घटनास्थळी ग्रामपंचायत सदस्य रजनीकांत पाटील, गजेंद्र विसपुते, माजी उपसरपंच मुराद पटेल, ग्रामपंचायत कर्मचारी किरण देसले तसेच अमन पटेल यांनी मदतकार्य केले.या वेळी उपस्थित नागरिकांनी चाळीसगाव नगरपरिषद फायर फायटर विभागाच्या कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# इन्स्टाग्रामवरील प्रेमसंबंधानंतर बांगलादेशातून थेट जळगावात आली बांगलादेशी तरुणी

## शनिपेठ पोलिसांनी तरुणीला घेतलं ताब्यात

जळगाव प्रतिनिधी

शहरात इन्स्टाग्रामवरील प्रेमातून थेट बांगलादेशातून भारतात आलेल्या एका तरुणीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विनाविसा भारतात राहत असल्याप्रकरणी शनिपेठ पोलिसांनी बांगलादेशी तरुणीला ताब्यात घेतले असून तिला आश्रय देणाऱ्या युवकाविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शनिपेठ पोलिसांना भोई गल्ली, जोशी पेठ परिसरात एक परदेशी महिला बेकायदेशीररीत्या राहत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी छापा टाकला असता २० वर्षीय कोणीका राणी शामलचंद्र राय ही तरुणी आढळून आली.

तपासादरम्यान तिच्याकडे कोणतेही वैध पासपोर्ट किंवा व्हिसा नसल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांच्या चौकशीत ती बेकायदेशीरपणे भारतात दाखल झाल्याचे उघड झाले आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

दरम्यान, कोणीका राणी आणि जळगावातील सोने कारागीर चिन्मय जगन्नाथ वाला यांची ओळख इन्स्टाग्रामवरून झाली होती. सोशल मीडियावरील मैत्रीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले आणि लग्नासाठी कोणीका हिने थेट बांगलादेशातून भारतात प्रवेश



केल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकरणी पोलिसांनी दोघांविरोधात इमिग्रेशन आणि परदेशी नागरिक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. कोणीका आणि चिन्मय यांनी आम्ही विवाह केल्याचा दावा केला असला तरी त्याबाबत कोणताही अधिकृत पुरावा अद्याप समोर आलेला नसल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

सध्या या प्रकरणाचा पुढील तपास साजिद मन्सूरी करत असून या घटनेमुळे सोशल मीडियातून वाढणाऱ्या संबंधांबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

# जिकरा न्यू उर्दू विद्यालयाचा दहावीला ९८.४०% निकाल

**जामनेर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने आज दिनांक ८ मे २०२६ रोजी घोषित करण्यात आलेल्या दहावीच्या निकालात जिकरा एज्युकेशन सोसायटी संचलित जिकरा न्यू उर्दू माध्यमिक विद्यालय, जामनेर येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ९८.४०% लागला असून विद्यालयाच्या यशामुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या निकालामध्ये कु. मिसबाह आसिफ शेख हिने ८४.८०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. अहेनिश नईम खान हिने ८३.४०% गुणांसह द्वितीय क्रमांक प्राप्त केला, तर मोहम्मद अकदस निसार अहमद यांनी ८३.२०% गुण मिळवून तृतीय क्रमांक संपादन केला.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रहीम शेख तसेच सचिव जाकीर शेख यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यालयाचे प्राचार्य इरशाद खान सर व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण मार्गदर्शन करून त्यांच्या यशात मोलाचा वाटा उचलला. तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# आदिवासी तडवी भिल समाज महापंचायतीपूर्वी यावल येथे तालुकास्तरीय बैठकीचे आयोजन

**यावल :** यावल , चोपडा, रावेर सह जळगाव जिल्ह्यातील मिटिंग आदिवासी तडवी भिल समाज महापंचायत, हरीपुरा यांच्या वतीने आगामी सामाजिक महापंचायतीच्या पूर्वनियोजनासाठी यावल तालुकास्तरीय महत्त्वपूर्ण मिटिंगचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील विविध प्रश्न, संघटनात्मक बांधणी तसेच महापंचायतीच्या नियोजनाबाबत चर्चा करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

ही मिटिंग बुधवार, दि. १३ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कृषि उत्पन्न बाजार समिती, बस स्टँडजवळ, यावल येथे संपन्न होणार आहे. समाजातील जास्तीत जास्त बांधवांनी उपस्थित राहून नियोजन कार्यात सहकार्य करावे, असे आवाहन आदिवासी तडवी भिल समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.



बैठकीमध्ये सामाजिक ऐक्य, युवकांचा सहभाग, समाजाच्या विविध समस्या तसेच आगामी सामाजिक उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार असून, महापंचायतीचे यशस्वी आयोजन करण्यासाठी सर्वांच्या सहभागाची आवश्यकता असल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे.

समाजहिताच्या दृष्टीने आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस समाजातील नागरिक, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मातृदिनानिमित्त आदर्श मातांचा गृह–सत्कार सोहळा

## डॉ. कलाम पुस्तक भिशीतर्फे मातांच्या निवासस्थानी जाऊन मातृऋण कृतज्ञतेचा अनोखा उपक्रम

जळगाव प्रतिनिधी

मातृदिनानिमित्त भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम पुस्तक भिशी, जळगावतर्फे विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या आदर्श मातांचा ङ्गगृह-सत्कारफ हा हृद्य आणि प्रेरणादायी उपक्रम दि. १० मे २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला. मातांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सन्मान करून मातृऋणाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा आगळावेगळा उपक्रम ठरला.

या उपक्रमात वृक्षसखी तथा वाचन चळवळीच्या कार्यकर्त्या प्रभावती पाटील यांच्या हस्ते यशोदा भगवान भटकर (वय ८३) व कमलबाई राणे (वय ८३) यांचा सत्कार करण्यात आला. माय माती फाउंडेशन अध्यक्ष वत्सला विश्राम पाटील तसेच व्रतस्थ वाचक मनीषा जयंत मोडक (वय ७७) यांचा सत्कार पुस्तक भिशीचे संस्थापक जिल्हा प्रमुख विजय लुल्हे यांच्या हस्ते झाला. मातोश्री सिंधु सुपडू सुतार (वय ७६) यांचा सत्कार सुवर्णा लुल्हे यांच्या हस्ते करण्यात आला.

उपक्रमांतर्गत प्रत्येक आदर्श मातांच्या निवासस्थानी जाऊन प्रथम सुपुत्र, सुकन्या व कुटुंबीयांच्या हस्ते अग्रपूजन व औक्षण करण्यात आले. त्यानंतर पुस्तक भिशीतर्फे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून शाल, श्रीफळ व वाचनीय पुस्तके देऊन मातांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी मातांचा चरणस्पर्श करून निरामय, निरोगी व दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देत आशीर्वाद घेतले.

सत्कारमूर्ती यशोदा भगवान भटकर यांचा परिवर्तनवादी विचार जोपासत तत्वनिष्ठ पत्रकारितेतून जनसामान्यांच्या अन्यायाला वाचा फोडणारे आणि नागरिकांना संविधानिक हक्क मिळवून देण्यासाठी लढणारे निर्भीड पत्रकार प्रा. डॉ. सुधीर भटकर यांना घडविल्याबद्दल गौरव करण्यात आला.

कमलबाई राणे यांचा कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा वारसा जपत आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी ङ्गविद्यार्थी सहाय्यक समितीफ्च्या माध्यमातून निवास व भोजन व्यवस्था उभी करणारे तसेच समाजातील दानशूर व भाजी विक्रेत्या माता-भगिनींकडून गेल्या १६ वर्षांपासून मोफत भाजीपाला उपलब्ध करून शेकडो विद्यार्थ्यांना घडविणारे निवृत्त प्राचार्य एस.एस. राणे यांना संस्कार दिल्याबद्दल गौरव करण्यात आला.

वत्सला विश्राम पाटील यांचा वृक्षसखी, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व अभ्यासिका संचालिका तसेच वाचन कट्टा चालविणाऱ्या आणि दोन हजार वृक्ष जगविणाऱ्या प्रभावती पाटील यांना घडविल्याबद्दल सन्मान करण्यात आला.

मनीषा जयंत मोडक यांचा उद्योगातून सचोटीने पारदर्शी सेवा देणे हीच समाजसेवा हा संस्कार देत लघुउद्योजक सुपुत्र घडविल्याबद्दल गौरव करण्यात आला.

cmyk

## १६ मे रोजी खरीप हंगाम पूर्वतयारी बैठक

**जळगाव :** पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय खरीप हंगाम २०२६ नियोजनाबाबत आढावा बैठक शनिवार दि. १६ मे २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जळगाव येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत शेतकऱ्यांना आवश्यक असलेली गुणवत्तापूर्ण बियाणे, खते व किटकनाशके यांसारख्या कृषी निविष्ठांची उपलब्धता, त्यांचे नियोजन तसेच गुणवत्ता नियंत्रणाबाबत उपाययोजना यांचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे.

# ट्रेनिंग ऑफ ट्रेनरमध्ये जळगाव पोलीस दलाची दमदार कामगिरी

## तीन सुवर्ण, दोन कांस्य पदक : पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरेंच्या हस्ते सत्कार

**जळगाव ।** महाराष्ट्र राज्य पोलीस दलासाठी आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय ट्रेनिंग ऑफ ट्रेनर (टीओटी) प्रशिक्षणामध्ये जळगाव जिल्हा पोलीस दलाने उल्लेखनीय कामगिरी करत तीन सुवर्ण पदके, दोन कांस्य पदके तसेच उत्कृष्ट टीमचा किताब पटकावला आहे. या यशामुळे जळगाव पोलीस दलाचा राज्यस्तरावर नावलौकिक वाढला असून पोलीस दलात आनंदाचे वातावरण आहे.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संकल्पनेतून राज्यातील पोलीस अधिकारी व अंमलदारांसाठी हे विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. वाढत्या गुन्हेगारी, दहशतवाद, नक्षलवाद, गँगवार तसेच गावठी कट्ट्यांच्या घटनांना प्रभावीपणे तोंड देता यावे, यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना शस्त्र हाताळणी, सुरक्षा, अचूक फायरींग आणि नागरिकांचे संरक्षण याबाबत अत्याधुनिक प्रशिक्षण देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. वेगवेगळ्या सत्रात जळगाव पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांनी सहभाग घेतला. या पथकाला श्रीकांत धिवरे आणि संदीप गावीत यांचे मार्गदर्शन लाभले. जळगाव पोलीस दलाकडून राखीव पोलीस उपनिरीक्षक सचिन चिवंडे, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक मुजफ्फर सैय्यद, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सोपानदेव पाटील, पोहेकॉ रज्जाक सैय्यद, पोहेकॉ संतोष सुरवाडे, महिला पोहेकॉ मेघना जोशी, पोना किरण सपकाळे, पोकॉ संदीप पाटील, पोकॉ समीर पठाण आणि महिला पोकॉ प्रियंका टेकारे यांनी सहभाग नोंदवला. या प्रशिक्षणामध्ये राखीव पोलीस उपनिरीक्षक सचिन चिवंडे यांनी शिकवणी प्रकारात ८३ गुण मिळवत सुवर्ण पदक पटकावले. श्रेणी पोलीस उपनिरीक्षक मुजफ्फर अली सैय्यद यांनी आंतरवर्गीय फायरींगमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत कांस्य पदक मिळवले. तसेच पोलीस अंमलदार समीर पठाण यांनी उत्कृष्ट प्रशिक्षणार्थी म्हणून सुवर्ण पदक पटकावले.



# कंत्राटी कामगार कायदा, कामगार संहितांबाबत बैठक

**जळगाव ।** कामगार आयुक्त यांच्या निर्देशानुसार तसेच कामगार उपायुक्त, नाशिक यांच्या मार्गदर्शनाखाली कंत्राटी कामगारांच्या समस्या व व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती संहिता २०२० या विषयावर कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम १९७० अंतर्गत नोंदित आस्थापना मालक व कंत्राटदार यांची मार्गदर्शन बैठक एमआयडीसी जळगाव येथील परिवर्तन सभागृहात आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस विविध आस्थापनांचे प्रतिनिधी, कंत्राटदार तसेच संबंधित अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी रेमंड लाईफ स्टाईल लि. चे मानव संसाधन विभाग अधिकारी राहुल क्षीरसागर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचा उद्देश व प्रास्ताविक सहाय्यक कामगार आयुक्त, जळगाव डॉ. राजू गुल्हाने यांनी केले. त्यांनी कंत्राटी कामगारांच्या समस्या, त्यांचे कायदेशीर संरक्षण तसेच नवीन कामगार संहितांमधील तरतुदींबाबत माहिती दिली. सरकारी कामगार अधिकारी आप्पा चाथे यांनी व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता अंतर्गत कंत्राटी कामगार विषयक तरतुदींवर सादरीकरण केले. त्यांनी कंत्राटी कामगार अधिनियम १९७० मधील नोंदणी, परवाना, कंत्राटी कामगारांचे हक्क व नियोयांच्या जबाबदाऱ्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या बैठकीत उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांचे निरसन करण्यात आले.

# भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या उपाध्यक्षपदी वसीम खान

**जळगाव ।** जळगावातील दंगलग्रस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरात रविवारी सामाजिक ऐक्य, राजकीय समावेशकता आणि विकासाचा अनोखा संगम पाहायला मिळाला. भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या पुढाकाराने आयोजित कार्यक्रमात वृक्षरोपण, वाचनालय उद्घाटन आणि नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी वसीम खान यांची भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या जळगाव जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. आमदार राजूमामा भोळे यांच्या हस्ते वसीम खान यांना नियुक्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विशेष म्हणजे, हा कार्यक्रम ज्या परिसरात झाला तो परिसर पूर्वी दंगलग्रस्त म्हणून चर्चेत होता. मात्र आता त्याच भागातून शांतता, शिक्षण आणि सामाजिक सलोख्याचा संदेश दिला जात असल्याचे चित्र पाहायला मिळाले. कार्यक्रमात बोलताना आमदार राजूमामा भोळे यांनी मोठी घोषणा करत दंगलग्रस्त कॉलनीला आता अब्दुल कलाम नगर म्हणून ओळख दिली जाईल, असे सांगितले. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन या भागात शिक्षण, विकास आणि सकारात्मक परिवर्तन घडवण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. भाजप हा सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारा पक्ष आहे. देशाच्या विकासात प्रत्येक घटकाचा सहभाग महत्त्वाचा आहे, असेही ते म्हणाले. या घोषणेनंतर उपस्थित मुस्लिम बांधवांमध्ये प्रचंड उत्साह संचारला. अनेकांनी जल्लोष करत भाजपच्या समर्थनार्थ घोषणा दिल्या. कार्यक्रमादरम्यान अनेक मुस्लिम युवकांनी आणि नागरिकांनी भाजपाचे सदस्यत्व स्वीकारले. त्यामुळे आगामी स्थानिक राजकारणात या कार्यक्रमाची चर्चा रंगू लागली आहे. नवीन जबाबदारी स्वीकारल्यानंतर वसीम खान यांनी भावना व्यक्त करत सांगितले की, अल्पसंख्यांक समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भाजप सातत्याने काम करत आहे.



# बांगलादेशी महिलेसह आश्रयदात्यावर कारवाई

## विनापरवाना रहिवास : शनिपेठ पोलिसांनी उगारला बडगा

**जळगाव ।** शहरात अवैधरित्या वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांविरोधात पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी सुरू केलेल्या विशेष शोध मोहिमे अंतर्गत शनिपेठ पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. विनापरवाना आणि अवैध मार्गाने भारतात प्रवेश करून वास्तव्यास असलेल्या एका बांगलादेशी महिलेला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, तिला आश्रय देणाऱ्या एका व्यक्तीवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शनिपेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील जोशी पेठ, भोई गल्ली भागात एक परदेशी महिला कोणत्याही वैध कागदपत्रांशिवाय राहत असल्याची माहिती पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी दि. १० मे २०२६ रोजी संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी कोणीका राणी शामलचंद्र राय (रा. बांगलादेश) ही महिला तेथे आढळून आली.घुसखोरी करून वास्तव्य केलेल्या तपासात पोलिसांना धक्कादायक माहिती समोर आली आहे. सदर महिलेने पासपोर्ट किंवा व्हिसा यासारख्या कोणत्याही वैध प्रवासी कागदपत्रांशिवाय घुसखोरीच्या मार्गाने भारतीय सीमेत प्रवेश केला होता आणि ती जळगावात अनधिकृतपणे राहत होती. प्रकरणी केवळ महिलेवरच नव्हे, तर तिला आश्रय देणाऱ्या चिन्मय जगन्नाथ वाला (रा. जळगाव, मूळ रा. पश्चिम बंगाल) याच्यावरही पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

संबंधित महिला ही बांगलादेशी नागरिक असल्याची माहिती असूनही, चिन्मयने ती पोलिसांपासून लपवून ठेवली आणि तिला आश्रय दिला, असा ठपका त्याच्यावर ठेवण्यात आला आहे. या दोघांविरुद्ध इमिग्रेशन आणि परदेशी कायदा २०२५ च्या कलम २१, ०८ आणि २४ अन्वये गुन्हा नोंदवून त्यांना अटक करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक साजिद मन्सूरी या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. जळगाव शहर पोलिसांनी सुरू केलेल्या या विशेष मोहिमेमुळे अवैध नागरिकांचे धाबे दणाणले आहेत.